पुण्य नगरी सोमवार, १० ऑगस्ट २०२६

# ‘विवेकानंद’मध्ये बौद्धिक संपदा हक्क नोंदणी कार्यशाळा

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज (अधिकार प्रदत्त स्वायत्त) येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि संशोधन विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने ‘बौद्धिक संपदा हक्क, तसेच पेटंट, कॉपीराईट व ट्रेडमार्क अर्ज प्रक्रिया’ या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

हेनान विद्यापीठ, चीन येथील प्रा. शान्हू लिऊ, शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीचे प्रा. डॉ. टी. डी. डोंगळे आणि राजाराम कॉलेज येथील इलेक्ट्रॉनिक विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. यू. लांडे हे तज्ज्ञ मार्गदर्शन करत आहेत.

कार्यशाळेचे दुसरे सत्र दि. १० ऑगस्ट रोजी होणार आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. समन्वयक डॉ. शुभांगी काळे, संशोधन विकास कक्षाचे समन्वयक डॉ. संजय लठ्ठे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. टी. दांगट यांनी प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे संयोजन केले.

फोटोग्राफी विभागप्रमुख प्रा. रवी सुतार यांनी कार्यशाळेचे यूट्यूबवर थेट प्रक्षेपण केले. पाहुण्यांची ओळख प्रा. समीक्षा फराकटे, डॉ. टी. सी. गोपाले यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ. सुप्रिया पाटील यांनी केले. आभार डॉ. अस्मिता तपासे, डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी मानले.